# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दि.२०/७/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०७) इतिवृत्त**

सोमवार, दिनांक २० जुलै २००९ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.४० वाजता** 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त(म)श्री. उध्दव घुगे, नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. जावेद हसन खान
०३. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०४. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०५. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०६. श्री. सुरे सिताराम इसराम
०७. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०८. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०९. श्रीमती मेहरून्नीसा खान हमीद खान
१०. श्री. पांडे विनायक प्रभाकर
११. श्री. सोनवणे कचरू श्रीपत
१२. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१३. सौ. मोमीन सफिया फिरदौस
१४. श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान
१५. श्री. शिंदे दामोधर माधवराव

**विषय क्र. ३४ :**

दिनांक १५/६/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (कार्यक्रम पत्रिका क्र.०३) इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. रविकांत गवळी : मागिल इतिवृत्तात काही विषयावर स.सदस्यांनी चर्चा केलेली आहे सनीसेन्टर जे 24, 36 मीटर रस्त्याच्या संदर्भात चर्चा झाली होती. संबधीतावर गुन्हे दाखल करावे त्या बाबतीत काय कार्यवाही केली.

मा.सभापती : सदर प्रकरणाची संचिका सहा.संचालक नगर रचना विभागाचे असे पत्र होते की संचिका शोधत आहे ती संचिका त्यांनी शोधलेली आहे.

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | : सनी सेन्टरच्या बांधकाम परवानगी संचिका मिळाली का? |
| मा.सभापती | : सनी सेन्टरच्या बांधकाम व भोगवटा प्रमाणपत्राचीही संचिका मिळाली आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :सनी सेन्टरचे डेव्हलपमेंन्ट झालेले बरोबर आहे बाकीचे कामधेनू संदर्भात काही निर्णय घ्यायचे बाकी आहे का ? |
| सहा.संचालक(न.र) | : सनी सेंन्टरच्या भोगवटा प्रमाणपत्राची व कामधेनूच्या रेखांकनाची संचिका सापडत नव्हती म्हणून मागिल बैठकीत संबधीतावर गुन्हे दाखल करावे असे आदेशीत केले होते .त्यानंतर दोन दिवसात संपुर्ण विभागाची पाहणी करून सनी कॉर्नरचे भोगवटा प्रमाणपत्राची संचिका सापडून मा.सभापती यांचे कडे सादर करण्यात आली आहे.कामधेनुची संचिका 1988 ची जुनी असल्यामूळे रेकॉर्ड विभागामध्ये शोध घेणे चालू आहे.दरम्यानच्या काळात कामधेनू येथील रेखांकनधारकाचे जे सेक्रेटरी आहे यांचेकडून सर्व कागदपत्राचे झेरॉक्स प्राप्त केले आहे. त्या अनुशंगाने संचिका सादर करीत आहे. |
| श्री.रविकांत गवळी | :कामधेनूचे लोक माजीसैनिक आहे त्यांनी सर्व कागदपत्र दिले त्यानुसार त्यांना भोगवटा प्रमाणपत्र दिले का ? |
| श्री.सिताराम सुरे | :कामधेनू सोसायटी ही 1988 पासूनची नसून 1994 ला मंजूरी दिली आहे. |
| मा.सभापती | :कामधेनूला कम्प्ले्शन दिलेले आहे. |
| सहा.संचालक (न.र.) | :भोगवटा प्रमाणपत्र संचिका माझे पाहण्यात आलेली नाही. रेखांकनाच्या संदर्भाने व तालुका निरिक्षक भूमि अभिलेख यांचे कडिल नकाशा प्राप्त केले आहे. सनी सेन्टरची भोगवटा प्रमाणपत्राची संचिका प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष साईडच्या ठिकाणी पाहणी करून त्याप्रमाणे निर्णय घेता येईल. |
| श्री.रविकांत गवळी | 24 मी.36 मी. रूंदीचे रस्ते,दोन्ही बाजूच्या इमारतीला बांधकाम प्रमाणत्र दिले बांधकाम परवानगी कोणत्या रूंदीच्या रस्त्यावर दिले. |
| मा.सभापती | :पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.नगर रचना विभागाकडून दोन पत्र प्राप्त झाले होते सनी सेन्टरची संचिका शोधण्याचे काम चालू आहे.ती मिळाल्यावर पाठवून देवू त्यानुसार सनी सेन्टंरची बांधकाम व भोगवटा प्रमाणपत्र अशा दोन्ही संचिका मिळाल्या आहे.कानधेनूची संचिका शोधण्याचे काम चालू आहे. |
| श्री.सिताराम सुरे | :कामधेनूच्या नागरीकांनी संचिका नगररचना विभागाकडे दाखल केलेली आहे तरी सुध्दा ती संचिका आता उपलब्ध नाही का ? |
| मा.सभापती | :कामधेनूची कार्यालयाची संचिका उपलब्ध नाही. |
| श्री.सिताराम सुरे | :सनी सेन्टरचे सध्या काम अस्तित्वात आहे काम चालू आहे यास स्थगिती दिली का ? |
| श्री.रविकांत गवळी | :सन 2007 मध्ये कम्प्ले्शन दिले तरी आज काम चालू आहे. |
| मा.सभापती | :2008 मध्ये कम्प्लेशन दिले आहे.पार्ट कम्प्लेशन घेतलेले आहे राहिलेले काम करीत आहे. |
| श्री.सिताराम सुरे | :जे काम होत आहे ते 45 मी. रस्त्यामध्ये बांधीत होत आहे. |
| सहा.संचालक(न.र) | :सनी सेन्टरची बांधकाम परवानगी व भोंगवटा प्रमाणपत्र व कामधेनूची रेखाकंनाची संचीका पाहिल्यास एक कुणी तरी रस्त्यावर पूढे आलेले आहे कोण आले हे संचिका मिळाल्यावरच माहिती मिळेल. |

श्री.सिताराम सुरे :पहिल्यादा परवानगी कुणाला दिली.

सहा.संचालक(न.र) :कामधेनुला पहिल्यांदा परवानगी दिली.संचिका बघूनच उर्वरीत माहिती मिळेल.

श्री.सिताराम सुरे :परवानगी देतांना बघावयास पाहिजे होते आता त्यांचेवर उपासमारीची वेळ आणली

श्री.भगवान घडमोडे :कामधेनू जेष्ठ नागरीक, माजी सैनिक आहे त्यांची हर्रासमेंन्ट होत आहे.

मा.सभापती :कामधेनू सोसायटीचे 55 लोकांनी माझी भेट घेतली सर्व वयोवृध्द नागरीक असून एकही 65 वर्षापेक्षा कमी नाही

श्री.रविकांत गवळी :एक कुणी तरी रस्त्यावर पुढे आले असा खुलासा केला 1994 जेंव्हा बांधकाम परवानगी दिली त्यावेळी सन 2000 मध्ये डीपी रोड हा 45 मी. चा होता..सन 2003 बांधकाम परवानगी दिली त्यावेळेस मोजणी नकाशा वगैरे डिटेल बघून घ्यावा.कोणी चुक केली सर्व समोर येईल.

श्री.भगवान घडमोडे :कामधेनूला 1994 मध्ये परवानगी दिली जाते सनी सेंन्टरला 2003 मध्ये तर रस्त्यात कोण बांधीत होत आहे परवानगी देतांना लेआऊट किती रस्ता किती मीटरचा आहे हे बघीतले असेलच आता कोण रस्त्यात बांधीत होते हे अधिका-यांना माहित पाहिजे.

श्री.सिताराम सुरे : कामधेनूचा जो 4.50 मी. रस्ता बांधीत होतो तो आपण लिहून घेतलेला आहे दोन वर्षापासून ते लोक चकरा मारतात.

श्री.देसरडा प्रंशात :तीन बैठकीपासून हा विषय चर्चेला येतो यात एक अहवाल सादर करावा असे निर्देश दिले होते. अहवाल प्रशासनाकडून आला का तो वाचन करून चर्चा करता येईल.

मा.सभापती :कामधेनू हौसींग सोसायटी व सनी कॉर्नरच्या संदर्भात संबधीत विभागाने अहवाल सादर करावा.

श्री.भगवान घडमोडे :अमरप्रित हॉटेलला उधारीमध्ये बांधकाम परवानगी बाबतच्या संदर्भात काय कार्यवाही केली.

मा.सभापती :अमरप्रितच्या संदर्भात स्थायी समितीने तीन पत्र संबधीत विभागाला दिले त्या विषयी अदयाप काहीही माहिती आलेली नाही.कोणत्या नियमानुसार अमरप्रितला उधारीमध्ये बांधकाम परवानगी दिली सहा.संचालक नगररचना यांनी खुलासा करावा.

प्र.सहा.संचालक(न.र.) :मागिल बैठकीत स्थायी समितीने आदेश दिल्या प्रमाणे अमरप्रितच्या बांधकाम परवानगीची संचिका त्याच दिवशी मा.प्र.आयुक्त व मुख्यलेखधिकारी यांचेकडे चौकशीसाठी पाठविण्यात आली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :चौकशी करावी म्हणून संबधीत अधिकारी यांना आपल्याकडून पत्रवगैरे दिले आहे का ?

मा.सभापती तत्कालीन आयुक्त व शहर अभियंता यांनी अमरप्रित हॉटेलचे काम बंद करण्याचे लेखी आदेश दिले बंद का झाले नाही खुलासा करावा.

प्रशासकीय अधि. :अमरप्रित हॉटेलचे बांधकाम थांबविण्या बाबत शहर अभियंता यांचे पत्र स्थायी समितीने निर्देश दिले त्याअनुशंगाने बांधकाम थांबविण्यासाठी

अमरप्रित हॉटेल मालकास पत्र दिले होते 2-3 वेळेस प्रत्यक्ष तेथे जावून बांधकाम थांबविलेले आहे.

मा.सभापती :महापालिकेचे पत्र संबधीत हॉटेल मालकाने घेतले नाही अशी माहिती आहे

प्रशासकीय अधिकारी :संबधीताने पत्र घेतले नाही.

मा.सभापती :20 दिवसात संबधीतास विभागाकडून पत्र निर्गमित झाले नाही इतर कार्यवाही केली नाही हे बरोबर नाही.

श्री.प्रशांत देसरडा एखादा बांधकाम परवानगी धारक प्रशासनाचे पत्र घेत नसेल तर संबधीत अधिकारी यांनी सदर ठिकाणी जावून सध्यस्थितीत असलेले काम थांबवावे व पंचनामा करावा त्यावर सहया घ्याव्या.संबधीताने प्रत घेतली नाही तर ती तेथे चिटकवुन डकविण्यात यावी.

प्रशासकीय अधि. :तशी प्रत तेथे डकविण्यात आली फोटोग्राफ घेतले आहे.

श्रीमती मेहरून्नीसा खान :पंचनामा करून नोटीस देवून त्या कालावधीत काम थांबविले नाही तर गुन्हा दाखल करायला पाहिजे होता.इमारत निरीक्षक प्रशासकीय अधिकारी नोटीस देत नाही पत्र देवून सुध्दा कार्यवाही करीत नाही.

मा.सभापती :शहर अभियंता यांचे आखत्यारीत प्रशासकीय विभाग येतो संबधीतास पत्र निर्गमित करण्याचे शहर अभियंता यांनी आदेशीत केले आतापर्यत पत्र संबधीताला निर्गमित केले नाही या बाबतीत शहर अभियंता यांनी काय कार्यवाही केली.

शहर अभियंता :या बध्दलचा अहवाल अदयाप माझेकडे आलेला नाही संबधीतांना सुचना दिल्या होत्या वार्ड अधिकारी यांना सुचना दिल्या होत्या

मा.सभापती :प्रशासकीय विभाग आहे वार्ड अधिका-यांचा संबध येत नाही.

श्रीमती मेहरून्नीसा खान : प्रशासकीय अधिकारी यांनी या बाबतीत कार्यवाही करायला पाहिजे होती.

श्री.रविकांत गवळी :प्रशासनाचे पत्र हॉटेल मालकाने घेतले नाही पुढे काय कार्यवाही केली स्पष्ट खुलासा दिला नाही आजही तेथे काम चालू आहे सभागृहाला काय निर्णय घ्यायचा तो घ्यावा.

श्री.प्रशांत देसरडा :नोटीस घेत नसेल तर पोलीस कुमक मागवावे जेसीबी मशीनने बैठक संपेपर्यत पाडण्याची कार्यवाही करण्याचे आदेश दयावे.

श्रीमती मेहरून्नीसा खान :नोटीस देत नाही पंचनामा करीत नाही प्रशासकीय अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी.

मा.सभापती : सहा.संचालक (न.र.) यांना अमरप्रितच्या परवानगी संदर्भात 3 पत्र पाठविले अद्याप पर्यत स्थायी समितीला माहिती का दिली नाही.

उपअभि.न.र.(श्री.निकम) : मा.सभापती यांनी पत्र दिल्यानुसार या विभागाकडून पत्र देवून माहिती दिलेली आहे त्याची प्रत आता माझेकडे नाही प्रत मिळाल्यानंतर दाखविण्यात येईल.

मा.सभापती : तीन वेळेस मी पत्र पाठविले ज्या दिवशी स्थायी समितीमध्ये या विषयावर चर्चा होती स.सदस्यानी या विषय मांडला होता या अगोदर मी पत्र देवून कळविले होते की अहवाल पाठवावा त्या दिवशी अहवाल आला नाही त्यानंतर चार बैठका झाल्या अपपर्यत पत्र माझेकडे आले नाही दिले असेल तर विभागाची स्थळप्रत दाखवावी.

उपअभियंता (न.र.) : माझे माहिती प्रमाणे पत्र देवून माहिती आपणाकडे दिली आहे.त्याची प्रत मागवित आहोत.

श्री.प्रशांत देसरडा : क्रांतीचौक येथील जसे तात्काळ काढले तसे हेही काढण्यास पाठवावे.

मा.सभापती : या संदर्भात उपआयुक्त (महसूल) तसेच मुख्य लेखाधिकारी यांचेकडे त्याच दिवशी संचिका पाठविली होती. मुख्य लेखाधिकारी यांचे पत्र आलेले आहे. कोणतीही बांधकाम परवानगी देतांना पुढील तारखेचा धनादेश घेवून बांधकाम परवानगी देवू शकत नाही. अहवाल आलेला आहे नगरसचिव यांनी तो सभागृहाला वाचून दाखवावा.

नगरसचिव : चौकशी अहवाल मा.नगरसचिव यांनी सभागृहात वाचून दाखविला. मा.सभापती : या अहवालातून हे स्पष्ट होते की उधारीमध्ये किंवा पुढील तारखेचा धनादेश घेवून बांधकाम परवानगी देण्याची नियमात कुठेही तरतूद नाही यांचा अर्थ नियमाचे उल्लघंन करून परवानगी दिली. बेटरमेंन्ट चार्जेस भरण्याच्या अटीवर ही बांधकाम परवानगी दयावी अशी तत्कालीन आयुक्त श्री. बंड साहेब यांनी संचिकेमध्ये नमूद केले असतांना सुध्दा बेटरमेंन्ट चार्जेसपोटी रू.7,76000/- भरणा करून न घेता बांधकाम परवानगी दिली. सन 2005 ला जी बांधकाम परवानगी घेतली त्यात रोडकटींग मध्ये काही जागा जात असल्याने त्याबध्दल संबधीताने हमीपत्र करून दिले परंतु त्यात चुकीचा सीटी सर्वे नं. टाकलेला होता. जेंव्हा संचिका परवानगीसाठी आली तेंव्हा संबधीतास तसे पत्र देवून चुकीचा सिटी सर्वे नं. टाकलेला आहे तो दुरूस्त करून द्यावा म्हणून कळविले होते. त्यावेळी त्यांनी नकार दिला असतांना बांधकाम परवानगी दिली या बाबतीत काय निर्णय घ्यायचा सभागृहाने ठरवावे. नियमानुसार 18 टक्के इन्ट्रेस लावायला पाहिजे होता 9 टक्के लावलेला आहे. त्याचाही धनादेश घेतलेला नाही. ज्यांच्या नावावर परवानगी दिली त्यांचे नावावर धनादेश नाही यावर पुर्वीही चर्चा झाली आहे.

श्री.नारायण कुचे :त्यावेळी सहा.संचालक नगररचना अधिकारी कोण होते परवानगी कुणी दिली.

श्री.सतीष कटकटे : त्यावेळी आयुक्त कोण होते याचाही खुलासा करावा.

मा.सभापती :प्रत्येक संचिका आयुक्त वाचतातच असे नाही या बाबतीची संचिका खालच्या अधिका-याकडून पुटअप झालेली आहे.तत्कालीन आयुक्त श्री. बंड साहेब यांनी बेटरमेंन्ट चार्जेस भरणा करण्या संदर्भात स्पष्ट असे नमूद केलेले आहे.

श्री.नारायण कुचे :या बाबतीची संचिका सादर करणारे कोणकोण अधिकारी होते सर्वांची नावे दयावी.

श्री.रविकांत गवळी :एफएसआय किती दिला पंचताराकित हॉटेल आहे मोबदला घ्यावा असे म्हटले तो कशाच्या अधारावर घ्यावा त्यांचे व्हॅल्यूशन कुणी काढले.व किती होते.

मा.सभापती :उधारीमध्ये बांधकाम परवानगी देता येते का म्हणून विचारणा केली होती जो अहवाल आला त्यात स्पष्ट असे म्हटले की पुढील तारखेचा धनादेश घेवून बांधकाम परवानगी देता येत नाही

श्री.प्रशांत देसरडा :20 टक्के रक्कत आता व उर्वरीत 80 टक्के रक्कम उधारीमध्ये घ्यावी असा निर्णय घेणारे त्यावेळचे आयुक्त कोण होते.

मा.सभापती :त्यावेळी श्री. बंड साहेब आयुक्त होते.

श्री.प्रशांत देसरडा :जे नियमात बसत नाही त्यांचा अवलंब करणे योग्य नाही. 80 टक्के रक्कम उधारीमध्ये घ्यावी हे कोणत्या नियमात बसते. आयुक्तांवर कार्यवाही करा अशी म्हणण्याची वेळ सभागृहात आली आहे. या प्रकरणात आयुक्तावरही कार्यवाही व्हायला पाहिजे.

मा.सभापती :बेटरमेंन्ट चार्जेसचा संबधीताने भरणा केलेले नाही.

श्री.प्रशांत देसरडा :आजच्या आज बांधकाम झालेल्या ठिकाणी सिल लावण्यात यावे.इमारत महापालिकेच्या ताब्यात घ्यावी.

श्री.नारायण कुचे :यात कोणकोणते अधिकारी आहे.

श्री.भगवान घडमोडे : या प्रकरणात जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही व्हावी.स्पष्ट अहवाल आलेला आहे.

मा.सभापती :उधारीमध्ये बांधकाम परवानगी देता येते का त्या विषयीचा अहवाल आहे.

श्री.भगवान घडमोडे :उधारीवर परवानगी दिली आताच अहवाल वाचन केला त्यात ज्या त्रुटी आहे त्याचा लेखाजोखा होवून सर्वांवर कार्यवाही व्हावयास पाहिजे.जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.सतीष कटकटे :दोषीवर कार्यवाही करावी.

मा.सभापती :कार्यवाही करण्यासाठी चौकशी समिती नेमावी लागेल.हा अहवाल उधारीमध्ये बांधकाम परवानगी देता येते किंवा नाही या संबधीचाच आहे.संपूर्ण माहिती घ्यावी लागेल.एकदम ॲक्शन घेता येत नाही.

श्री.प्रशांत देसरडा :संपूर्ण अहवाल दिला नाही कशासाठी सादर केला.

मा.सभापती :सीटीएस नंबर 13167 हॉटेल अमरप्रितच्या बांधकाम परवानगी बाबत उपआयुक्त (महसूल) व मुख्य लेखाधिकारी यांची एक चौकशी समिती स्थापन केली होती चौकशी समितीचा अहवाल आलेला आहे त्यात स्पष्ट केलेले आहे की महापालिकेला उधारीमध्ये कुणासही बांधकाम परवानगी देता येत नाही अशी नियमात कुठेही तरतूद नाही या प्रकरणात आणखी महत्वाचे मुद्ये आहे संबधीताकडून 7.76 लक्ष हे बेटरमेंन्ट चार्जेस म्हणून भरणा करून घेण्यात आलेला नाही आणखी काही मुद्ये आहे या संदर्भात कार्य.अभियंता श्री. पानझडे यांची कमेटी नेमण्यात येते त्यांना श्री. खंन्ना उपअभियंता हे मदत करतील त्यांनी 15 दिवसाच्या आत या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून अहवाल सादर करावा. सदर ठिकाणी बांधकाम चालू असेल तर ते प्रशासकीय अधिकारी यांनी त्वरीत थांबवावे. बांधकाम चालू राहिल्यास संबधीत भागाचे इमारत निरीक्षक व प्रशासकीय अधिकारी यांचेवर कार्यवाही केली जाईल.

श्री.भगवान घडमोडे : एक व्यक्ती वेठीस धरतो. त्याला धडा शिकवावा लागेल.

श्री.भगवान घडमोडे :महानगरपालिकेच्या मालमत्ता व दुकानांच्या विषयी मागील बैठकीत विचारणा करण्यात आली होती लिलाव झाला का? त्याबाबतीची माहिती सभागृहात देण्यात यावी. सिडको हडको येथील विद्युत पोलवर विविध

संस्थानी बोर्ड लावले आहे. काही कोचिंग क्लासेस चालविणाऱ्यांचे बोर्ड लावण्यावरून भांडणे झाली आहे पोलची परवानगी कुठल्या एजन्सीला आहे याबाबत वारंवार विचारणा करण्यात आली आहे त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

मालमत्ता अधिकारी :औरंगाबाद महानगरपालिकेच्या क्षेत्रातील शहरातील एकुण 1393 सिडको प्लॅटधारकांचा 469 मिळकती मिळुन 1862 मिळकती महानगरपालिकेच्या मालकीच्या आहेत. 844 मालमत्तेवर महानगरपालिकेच्या नावावर सात बारा व पिआर कार्ड अद्यावयत तयार करण्यात आलेले आहे. नोव्हेंबर पर्यत 215 होती आता पीआर कार्ड आणि सातबारा 844 अशी तयार करण्यात आलेली आहे. उर्वरित 549 प्रकरणांमध्ये 121 प्रकरणे मा.तहसिलदार व 234 प्रकरणे नगरभुमापन अधिकारी यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेली आहेत. सदरील सर्व प्रकरणे कार्यवाही अंतर्गत आहे.

श्री.भगवान घडमोडे :यापैकी दुकानांची संख्या किती आहे.

श्री.विनायक पांडे :सर्व मालमत्तेची वेगवेगळया भागांची यादी तयार केली आहे काय?

मालमत्ता अधिकारी :ज्या ज्या प्रॉपर्टी आपल्या नावावर झालेल्या आहेत त्या त्या भागातील विभागावाईज यादी केलेली आहे. रजिष्टरवर नोंदी घेतलेल्या नाही. महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील जवळपास 690 दुकाणे आहेत. 608 दुकाणे भाडेतत्वावर दिलेली आहेत. 66 दुकाणे भाडेतत्वार देण्यासाठी टेंडर काढण्यात आले होते परंतु त्यास तात्पुरती स्थगीती दिलेली आहे. शहागंज येथीत भाजीपाले यांची ओटयांची संख्या 172, औरंगपूरा 150, स्टेशन 18 अशी 340 अशी छोटे छोटे गाळे आहेत. शहरात मत्स व्यवसाय आणि माती व्यवसाय हर्सुल येथे ठेका पध्दतीने देण्यात आलेले आहे. सन 2009-10मध्ये तीन आठवडी बाजार असून एक रविवार बाजार,आठवडी बाजार, पीर बाजार दोन बाजार आपल्या नियमात बसतात त्यांची वसुली चालू आहे.

मा.सभापती :आठवडी बाजार येथे 26 गाळे होते त्यातील 3 गाळे एका व्यक्तिने आरसीसीचे बांधलेले आहे ते पाडण्याचे आदेश देण्यात आले होते. प्रशासनाने कुठली कारवाई केलेली आहे खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी :सदरील जागा महानगरपालिकेच्या हद्दीतील आहे. बांधकाम पाडण्यासाठी प्रशासकीय अधिकारी यांना दोन वेळेस पत्र देण्यात आलेले आहे.

मा.सभापती :महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये एका व्यक्तिने अनाधिकृतपणे बांधकाम केलेले आहे ते का पाडण्यात आले नाही.

श्री.भगवान घडमोडे :मागील बैठकीत प्रशासनाने 720 दुकाना सांगीतल्या होत्या यावेळेस 690 दुकाना सांगण्यात आल्या आहेत.

मालमत्ता अधिकारी :मालखरे बिल्डींग, गारखेडा परिसरातील जी 7 दुकाने आहेत ती वार्ड कार्यालयासाठी राखुन ठेवण्यात आली आहे. एकनाथ नगर येथील 27 दुकानांपैकी 3 दुकाने राखुन ठेवण्यात आलेली आहेत.

श्री.भगवान घडमोडे :शहागंज येथे किती दुकाना आहेत.

श्रीमती मेहरून्निसा खान :कुठल्या भागात किती दुकाना आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

| | |
|---|---|
| मालमत्ता अधिकारी | :शहागंज व्यापार संकुलात 158 दुकाना आहे. |
| श्री.भगवान घडमोडे | :भाजी मार्केट रीकामे करण्यात आली होती त्याबाबतीत काय झाले. |
| श्री.प्रशांत देसरडा | :158 पैकी महानगरपालिकेच्या ताब्यात किती दुकाने आहेत. |
| मालमत्ता अधिकारी | :155 दुकाना भाडयाने देण्यात आली आहे आणि 3 दुकाना रिक्त आहेत. |
| मा.सभापती | :ज्या लोकांना भाडे तत्वावर दुकाने दिल्या आहेत तेच लोक तिथे आहेत काय? |
| मालमत्ता अधिकारी | :ज्या लोकांना भुतकाळात दुकाने दिली आहेत तेच कार्यरत आहे तसेच जे हयात नाही त्यांचे दुकाने दुसऱ्या व्यक्तिंच्या नावे करून भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. |
| मा.सभापती | :मुळ लोक तिथे कार्यरत नाही. |
| मालमत्ता अधिकारी | :बहुतांश लोक तिथे नाही. |
| मा.सभापती | :सिडको येथील पोलबाबत खुलासा करण्यात यावा. |
| मालमत्ता अधिकारी | :सिडको येथील पोलवर ॲड लावण्यासाठी ड्रिम्स क्रिएशनचे श्री.हबीब खान यांना परवानगी दिलेली आहे. असे आपण 41 एजन्सीला परवानगी दिलेली आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :ज्या ॲड एजन्सी आपण दिलेल्या आहेत जीथे परवानगी घेतलेली आहे तिथेच सदरील बोर्ड आहे काय? काही ठराविक बोर्ड हे नगरसेवकांचे किंवा इतर नेत्यांचे पोस्टर लावलेले असतात. हया शहरामधील किती बोर्डांना परवानगी दिलेली आहे, किती पॉईंट आहे आणि त्याची रक्कम किती आहे व महानगरपालिकेस किती उत्पन्न आहे याबाबतची माहिती देण्यात यावी. जिल्हापरिषदेच्या नाल्यामधील ग्राउंडला जे बोर्ड लावलेले आहे त्याचे उत्पन्न जवळपास 3.50 लाख रूपये जिल्हापरिषदेला जमा होतात. अशा प्रकारे महानगरपालिकेनेही नाल्यामधे बोर्ड लावण्यास परवानगी दिलेली आहे. शहरातील एकही रोड असा नाही की तो बोर्ड बॅनर पासून वंचित नाही. प्रशासकीय अधिकारी तसेच प्रशासनाने याकडे गांभिर्याने लक्ष दिले गेले पाहिजे. डायरेक्ट महानगरपालिकेला पैसा मिळावा यासाठी प्रयत्न केले पाहिजे. उधारीमध्ये जी परवानगी दिलेली आहे तर ज्या ज्या बिल्डर्सना परवानगी दिलेली आहे त्या सर्व बिल्डर्सची परवानगी तपासण्यात यावी. जागेवर जावून किती बिल्डींग किती मजल्याच्या झाल्या आहेत ते तपासून मा.आयुक्तांना रिपोर्ट देण्यात यावा. यामुळे महानगरपालिकेस आर्थीक फायदा होईल. चिश्तिया कॉलणी हा भाग गुंठेवारीमध्ये असुन मोठमोठे बंगले त्या ठिकाणी तयार झालेले आहे. मालमत्ता अधिकारी यांनी दोन दिससांमध्ये यादी आणि भरलेले पैसे आणि किती पैसे मिळतात याबाबत माहिती देण्यात यावी. |
| मा.सभापती | :स.सदस्य श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत माहितीसाठी किती वेळ लागेल. |
| मालमत्ता अधिकारी | :दोन दिवसात माहिती देण्यात येईल. |
| श्री.रविकांत गवळी | :महानगरपालिकेच्या इमारती महिनोन महिने रिक्त राहतात. बांधकामाचा दर्जा खराब असतो. बऱ्याच भाड्याने दिलेल्या दुकाना संदर्भात वाद होण्याची |

शक्यता असते. दुकान भाड्याबद्दल जी समिती आहे भाडे ठरवितांना विचार करावा. 824 मालमत्तावर नांव आले. जे काम करतात त्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी वेतनवाढ करावी.

श्री.भगवान घडमोडे :जे चांगले काम करतात त्यांना वेतनवाढ देण्यात यावी. जे काम करीत नाही त्यांना शिक्षा करावी.

मा.सभापती :स.सदस्यांनी सांगीतल्याप्रमाणे श्री.जाधव यांनी चांगले काम केलेले आहे मा.आयुक्त ते काम बघतील आणि त्याची पडताळणी करून त्यांना एक वेतनवाढ देतील.

श्री.भगवान घडमोडे :चिकलठाणा येथे सन 1995 साली जी भाजी मंडई होती तीथे आरसीसी भाजीमंडईसाठी तेथील लोकांना हटविण्यात आले व नविन आरसीसी भाजी मंडई तयार करण्यात आली. आज सदरील व्यक्ती हे चकरा मारत आहे त्यांना भाजी मंडई येथे जागा देत नाही. समोर महानगरपालिकेचे वार्ड कार्यालय आहे ते रिकाम्या स्थितीत आहे ते भाडयाने देण्यात आले असे मला समजले आहे. त्याबाबत कुठलेही टेंडर काढण्यात आले नाहि प्रस्ताव देण्यात आला व तो मंजूर करण्यात आला. सदरील झोन ऑफिस कुठल्या नियमान्वये देण्यात आले.

श्री.सतिष कटकटे :रविवार बाजारात महानगरपालिकेकडुन वसुली केली जाते सध्या पावसाळयाचे दिवस आहे त्या ठिकाणी दुरूस्ती करण्यात यावी. रविवारच्या बाजारातुन साधारणत: दहा ते बारा लाख रूपये वसुल होतात त्याठिकाणी दुरूस्ती झाली पाहिजे.

श्री.प्रशांत देसरडा :रविवारचा बाजार नियमान्वये भरला जातो काय? खुलासा करण्यात यावा

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी :रविवार आठवडी बाजार हा नगरपरिषदेच्या काळापासून भरत आहे. महाराष्ट्र शासनाची पिआर कार्डवर अद्यापही नोंद आहे. इतर लोकांनी पिआर कार्ड नावावर केलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या ज्या प्रॉपर्टीज आहेत तिच्यावर महानगरपालिकेचा ताबा आहे आपण वारंवार टेंडर काढुन मार्केटमध्ये बाजार भरवितो. ताबा असल्यामुळे एसएलआरकडे अपिल करण्याचे ठरविलेले आहे.

श्री.सतिष कटकटे :सध्या रविवारचा बाजार रविवारच्या बाजारात भरतो काय?

मालमत्ता अधिकारी :जेव्हा जेव्हा पाउस पडतो त्यावेळी चिखलाची परिस्थिती निर्माण होते बाजाराच्या मध्यभागी मोठा नाला वाहतो. त्या ठिकाणी कडबी मंडीसुध्दा आहे.

श्री.सतिष कटकटे :कडबी मंडी भरविले जाते कटींग केली जाते त्याची परवानगी घेतली आहे काय? त्याठिकाणी 10 ते 12 मशीन आहेत त्यास लाईसन दिलेले आहे किंवा नाही.

मा.सभापती :कडबीमंडीद्वारे महानगरपालिकेस उत्पन्न होते काय?

मालमत्ता अधिकारी :आठवडी बाजाराचे संपूर्ण वर्षाचे टेंडर काढलेले आहे.

मा.सभापती :कडबीमंडी हि अनाधिकृत चालत आहे.

श्री.सतिष कटकटे :तेथील जमीनीवर अतिक्रमण करण्यात आलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा :रविवार आठवडी बाजारावर ज्यावेळी महाराष्ट्र शासनाचे त्या पिआर कार्डवर नांव होते त्यावेळपासून ते म्हणतात. मध्यंतरी महाराष्ट्र शासनाचे नांव पिआर कार्डवरून निघून गेले दुसऱ्या व्यक्तिंचे नांव पिआर कार्डवर आले तरीही आज पर्यंत महानगरपालिकेकडुन नांव कसे आले याबाबत पत्रव्यवहार झालेला नाही. झालेला असेलतर पाठपुरावा झालेला नाही. सक्षम अधिकाऱ्यामार्फत सदरील जागेबाबत मा.जिल्हाधिकारी यांचेकडे जावून पाठपुरावा का केला जात नाही.

श्री.सतिष कटकटे :12 लाख रूपये रविवार आठवडी बाजारातुन वर्षाला वसुली केली जाते तर सुविधा का नाही दिली जात. त्याठिकाणी हायमास्ट मंजूर आहे परंतु हायमास्ट लावत नाही कारण प्रशासनाचे म्हणने आहे की सदरील जागा महानगरपालिकेची नाही.

श्री.प्रशांत देसरडा :रविवारचा बाजार पुर्णपणे रोडवर भरतो त्याकारणाने पायी चालणेही अवघड होते. 3 एकर जागेमध्ये बाजार भरत नाही तर भर रोडवर बाजार भरविला जातो.

श्री.सतिष कटकटे :बाजारास सुविधा देणार आहे किंवा नाही.

मा.सभापती :बाजारास सुविधा देणार आहे. अतिरिक्त शहर अभियंता यांनी स्वतः सदरील ठिकाणी प्रत्यक्ष जावून पहाणी करावी व तेथील अडचणी दुर कराव्यात.

अति.शहर अभियंता :त्या ठिकाणी तांत्रिक अडचणी आहे. जागा आपल्या नांवावर नाही.

मा.सभापती :जागा जरी महानगरपालिकेच्या नावांवर नसेल तरी 40 वर्षापासून जागा महागनरपालिकेच्या ताब्यामध्ये आहे बाजार नियमीत भरत आहे वसुली केली जात आहे.

अति.शहर अभियंता :पिआर कार्ड ज्यांच्या नावांवर आहे ते अडचणी निर्माण करू शकतात.

मा.सभापती :ज्यांच्या नांवावर पिआर कार्ड आहे त्यांनी कधी आक्षेप घेतला आहे काय? प्रशासनाने याबाबतीत कोणती कारवाई केली. याबाबत प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी. 23 दुकाने त्याठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीच्या आहे एका व्यक्तीने 3 दुकाने आरसीसीच्या बांधलेल्या आहेत त्या दुकाने पाडण्याचे आदेश देण्यात आले होते.

श्री.भगवान घडमोडे :मालमत्ता अधिकारी यांनी रिपोर्ट दिला असेल आणि प्रशासकीय अधिकारी यांनी कारवाई केली नसेलतर हि गंभीर बाब आहे.

मा.सभापती :40 वर्षापासून आपल्या ताब्यात आहे. ज्यांची आहे असे जे म्हणतात त्यांनी आक्षेप घेतला का. उद्याच कार्यवाही करा. 3 दुकाने एका व्यक्तीने बांधले, ते पाडण्याचे आदेश झालेले आहे. प्रशासकीय अधिकारी यांनी का पाडले नाही.

प्रशासकीय अधिकारी :दिनांक 15.06.2009 रोजीच्या स्थायी समितीमध्ये नाल्याला लागून असलेल्या दुकानांचे अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिलेले होते. जुना मोंढा व्यापारी संकुलालगत पक्के दुकाने असल्याचे निर्देशनास आले त्यापैकी मनपा दुकाने कोणती व अतिक्रमणे कोणती याचा बोध होत नसल्याने नकाशा व संबंधीत विभागाचा प्रतिनिधी जागेवर हजर राहून अतिक्रमण काढुन टाकण्यात येईल.

मा.आयुक्त :हि अतिक्रमण आहेत हे निश्चित झालेले आहे. बांधलेले आहे. आठ दिवसांमध्ये अतिक्रमण काढण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे :चिकलठाणा येथील झोन ऑफिस भाडयाने दिलेले आहे काय? भाडयाने दिले असेलतर कशा पध्दतीने भाडयाने दिलेले आहे टेंडर काढण्यात आलेले आहे काय? लिलाव झालेला आहे काय?

श्री.नारायण कुचे :चिकलठाणा झोनचा विषय ऐणवेळेवर आला आणि मंजूर करण्यात आला.

मा.सभापती :सदरील व्यक्तीच्या ताब्यात देण्यात आले आहे काय?

श्री.भगवान घडमोडे : पाच, सात ते बारा लाख रूपये डिपॉझिट घेवून दुकाने भाडयाने दिली आहे. अशा काही प्रॉपर्टी आहे त्या शोधून त्यांचा लिलाव करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिकेच्या अशा सर्व दुकाना शोधुन काढुन त्या भाडयाने देण्यात याव्यात. आरआर नुसार एखादया आठ बाय दहाच्या दुकानाचे भाडे नियमानुसार दहा हजार रूपये येते. आजूबाजूला खाजगी दुकानदार हजार बाराशे रूपयांनी भाडयाने दिले जाते जास्त भाडे असल्याने दुकाने कित्येक वर्ष बंद अवस्थेत राहतात त्याचे मेंन्टनन्स होत नाही. उत्पन्न बुडते यामुळे ऑडिटमध्ये समस्या निर्माण होत नाही काय?

श्री.भगवान घडमोडे : शोधा, लिलाव करा किंवा निविदा काढावी.

श्री.रविकांत गवळी : शोधून काढून भाड्याने द्यावे. लिलाव करून व टेंडर काढून भाड्याने जात नाही. 10 ते 12 हजार भाडे होते. त्यामुळे ते रिकामे राहते. बाजुलाच 1000/- ने भाड्यावर मिळते.

श्री.भगवान घडमोडे : टेंडर काढुन जर कोणी आले नाही तर भाडे समितीकडे प्रकरण येवु दयायला पाहिजे.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी :सदरील झोन कुणाच्याही ताब्यात दिले नाही.

मा.सभापती :ॲग्रीमेंट झालेले आहे काय?

मालमत्ता अधिकारी :ॲग्रीमेंट झालेले नाही.

श्री.भगवान घडमोडे :दुकाण भाडयाने देण्याचे प्रस्तावित केले आहे काय?

मालमत्ता अधिकारी :मा.स्थायी समितीमध्ये प्रस्ताव ठेवला होता. रेट जास्तीचे असल्याने कुणी घेणार नाही तसेच आजुबाजूच्या तुलनात्मकदृष्टया विचार करून भाडयाने देण्यात यावे असे स्थायी समितीने निर्देश दिले होते.

श्री.भगवान घडमोडे :दुकानाकरीता व हॉलकरीता लिलाव काढलेला आहे काय?

मालमत्ता अधिकारी :लिलाव काढलेला नाही.

श्री.भगवान घडमोडे :चिकलठाणा येथील दुकानांचे लिलाव करून बोली बोलुन ऑफिसची इमारत देण्यात यावी.

मा.सभापती :नियमानुसार सर्व प्रक्रिया पुर्ण करून भाडयाने देण्यात यावे. स.सदस्य श्री.प्रल्हाद निमगांवकर यांच्या वार्डात तीस दुकानांचे शटर चोरीस गेले आहे त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी :महानगरपालिकेची गारखेडा भागात 7 दुकाने आहेत ते ऑफिससाठी रिझर्व ठेवण्यात आलेले आहे. नुपूर अपार्टमेंटमधे 9 दुकाने आहेत, जी 7 दुकाने आहेत त्या वार्ड कार्यालयासाठी राखीव ठेवलेले आहे. नुपूर अपार्टमेंटमधील

9 दुकानांची निवीदा काढण्यात आली होती तो विषय मा.स्थायी समितीने स्थगीत ठेवलेला आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :कमी रेटनी का असेना दुकाने भाडे तत्वावर देण्यात यावे.

मा.सभापती :नुपूर अपार्टमेंट येथील 9 दुकाने भाडयाने देण्यासाठी प्रक्रीया करण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी :स.सदस्यांच्या म्हणण्यानुसार कमी रेटने भाडयाने देण्यात यावे आणि दुसरीककडे नियमानुसार निवीदा काढुन भाडयाने देण्यात यावे म्हणजे निर्णय काय घेणार.

श्री.भगवान घडमोडे :ट्रस्टी म्हणुन महानगरपालिकेच्या प्रापर्टी वाचविण्यासाठी संस्थेचा फायदा करण्याकरीता जनतेने पाठविलेले आहे. डायरेक्ट दुकाना देण्यास माझा विरोध आहे नियमानुसार दुकाने भाडयाने देण्यात यावीत.

श्री.प्रशांत देसरडा :या ठिकाणी मालमत्ता, उधारीची परवानगी, कामधेनु सोसायटी या सर्वांवर चर्चा केली. ज्या गोष्टींची माहिती मिळते त्या गोष्टींची सभागृहात चर्चा होते व त्याची चौकशी होते. परंतु ज्या गोष्टी माहितीच नाही उदा.अमरप्रित हॉटेल असे कितीतरी प्रकरणे आहेत, अशा प्रकारच्या किती परवानगी आहे ज्या उधारीत दिलेल्या आहेत व त्या लोकांनी पैसे भरलेले नाही. एक समोर आली अश्या किती आहेत.

मा.सभापती : ADTP नी खुलासा करावा की बांधकाम परवानगी उधारीत किती जणांना दिलेली आहे त्याची एकुण संख्या किती आहे.

मुख्य लेखाधिकारी :अमरप्रीतचा ज्या वेळी विषय बैठकीत आला होता तेव्हा सर्व विभागांना पत्र देण्यात आले होते ज्या ज्या विभागाकडे पोस्ट डेटेड चेक असेल त्यांनी लेखा विभागाकडे चेक जमा करावेत. त्यानुषंगाने एमजीएमला परवानगी दिलेली आहे 1 कोटीची जे पोस्ट डेटेड चेकची आहे. त्यापैकी 31 किवा 33 लाखाचा चेक 31 जुलैचा डयु डेट आहे. साधारणतःतीन तीन महिण्यानंतरचे चेक रिलीज होतील 1 कोटीचे चेक माझ्याकडे प्राप्त झालेले आहेत.

श्री.प्रशांत देसरडा :अशा उधारीच्या परवानगीची संख्या बरीच आहे त्यांची चौकशी व्हावी.

श्री.रविकांत गवळी :एमजीएम संस्थेस मालमत्ता कर लावण्यात आला आहे काय? पुढील तारखेचे चेक कसे घेतले.

श्री.प्रशांत देसरडा : दीड प्लॉट आहे. अर्धा शिल्लक. त्याचा टॅक्स भरायला लावले. एम.जी.एम. सारख्या संस्था त्यांचेकडे पैसे ठेवायला जागा नाही. एक सापडली. मुख्य लेखाधिकारी यांनी डेअरींग केली. उधारीच्या परवानग्या अनेक असतील.

उपआयुक्त (प्र) :एमजीएम संस्थेकडुन मालमत्ता कराची कर आकारणी केलेली आहे जवळपास 35 लाख रूपये थकबाकी आहे. एमजीएम संस्थेने एक अर्ज केलेला आहे की, चॅरिटेबल संस्था असल्याकारणाने त्यांना कर माफ करावे अशी त्यांची विनंती आलेली आहे.सदरील संचिका माझ्याकडे आलेली आहे दोन दिवसांमध्ये निर्णय घेण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी :मालमत्ता कर लावण्यासंदर्भात काही नॉर्मस् आहेत काय? आजरोजी एमजीएम संस्थेकडुन 1 कोटी रूपयांची मालमत्ता कर घ्यायला पाहिजे. आज रोजी 5 इमारतींचे बांधकाम पुर्ण होवुन वापर सुरू आहे अजुन कर लावण्यात

आलेले नाही. या संदर्भात पैठणला जी बैठक झाली होती. त्यावेळीही चर्चा निघाली होती.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शहरात ज्या काही संस्था,एनजीओ, उदा.मौलाना आझाद,एमजीएम, बजाज हेगडेवार या सर्व काही संस्था आहे त्या सर्व संस्थाकडुन मालमत्ता वसुली केली पाहिजे. परंतु ज्या ठिकाणी शैक्षणिक ॲक्टिव्हिटी चालतात त्या सर्व संस्थाना मालमत्ता कर लावला पाहिजे. नियम सर्वांना सारखे लावण्यात यावे. सदरील समस्या मुंबई,नागपूर येथेही आहे यास फक्त बिझनेस न बघता शैक्षणिक संस्थांना नियमाप्रमाणे कर सवलती देण्यात याव्यात. कमर्शियल आहे का बघावे.

श्री.रविकांत गवळी :पैठण येथील बैठकीत एमजीएम, हायकोर्ट संबधी विषय निघाला होता वार्ड अधिकाऱ्यांच्या खुलाश्यानुसार 70 लाख रूपये बाकी आहे,आता उपआयुक्त (प्र)यांनी खुलासा केला की, 35 लाख रूपये बाकी आहे. कर कमी करून देण्याच्या संदर्भात 1 कोटी 20 लाख बाकी असतांना पत्र दिलेले आहे हा कर माफ करण्यात यावा म्हणून अदयाप पर्यंत निर्णय घेतलेला नाही असे सांगण्यात आले होते जी बाकी दाखविलेली आहे त्यात तफावत आहे या संदर्भात खुलासा करण्यात यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :तापडीया नाटयगृह, एस.बी. संस्था व सर्व संस्था शाळा यांना मालमत्ता कर किती लावले आहे आणि शहरातील जेवढे मोठे हॉस्पीटल चालतात त्यांना मालमत्ता कर लावण्यात यावा.

श्री.विनायक पांडे :ज्या शैक्षणिक संस्था आहेत त्या संस्थामधुन प्रति विद्यार्थी 20/25 लाख फिस आकारली जाते. शहरात जेवढया शैक्षणिक संस्था येतात त्या सर्वांना एकसारखी कर आकारणी आकारली पाहिजे.

श्री.भगवान घडमोडे :ज्या शैक्षणिक संस्था आहे त्यांच्याकडे दहा ते पंचविस लाख रूपये बाकी आहे शासनाचा जिआर दाखवून कर भरत नाही. वर्षानुवर्ष भरत नाही. महानगरपालिकेने ठोस पॉलिसी तयार करून त्यांच्याकडुन कर वसुली केली पाहिजे. प्रत्येक संस्थेकडे करोडो रूपये बाकी आहे. शैक्षणिक संस्थेचे म्हणने आहे की आम्हाला शासनाने सवलत दिली आहे. तरी याबाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घेवून लवकरात लवकर वसूली करण्यात यावी. आणि संबंधीतांना उत्तर देण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :डेव्हलपमेंटच्या नावाखाली शहरात नविन नविन मॉल्स उभे राहत आहे याचा विचार प्रशासनाने करावा.

मा.सभापती :औरंगाबाद शहरात मंगल कार्यालय आहेत काय?

श्री.विनायम पांडे :मंगल कार्यालयांना कर लावण्यात आले आहे काय?

मा.सभापती :मा.श्री.कराड यांच्या वाढदिवसासाठी गेलो असता त्या मंगल कार्यालयाचे भाडे 40 हजार रूपये आहे परंतु महानगरपालिकेमध्ये त्याची नोंद नाही.

श्री.भगवान घडमोडे :असे कितीतरी विषय आहेत मा.सभापती यांनी मेहनत घेवून नळांचा सर्वे केला होता.

श्री.नारायण कुचे :इडन गार्डनचे भाडे 75 हजार रूपये आहे.

मा.सभापती :रेकॉर्डवर इडन गार्डनची नोंद नाही. प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :औरंगाबाद शहरात मंगल कार्यालय आणि मॉल्सचा व्यवसाय तेजीत आहे. निराला बाजार येथील ओपनस्पेसमध्ये बांधकाम केलेले आहे त्याचा सर्वे करायला पाहिजे. शैक्षणिक संस्था,मंगल कार्यालय,मॉल्स अशा ज्या व्यवसायीक संस्था आहे त्यांना टॅक्स लावला पाहिजे.

मा.सभापती :औरंगाबाद शहरात मंगल कार्यालय आहेत काय प्रशासनाने खुलासा करावा.

श्रीमती मेहरून्निसा खान :औरंगाबाद शहरात प्रत्येक वार्डात मंगल कार्यालय आहे परंतु त्याबाबतची नोंद नाही. माझ्या वार्डात आठ मंगल कार्यालय आहे त्याची नोंद नाही.

मा.सभापती :याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.रविकांत गवळी :बांधकाम झालेले आहे परंतु टॅक्स लावण्यात आलेला नाही याबाबतचीही माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त (प्र) :स.सदस्यांनी शहरातील मालमत्ताच्या कराबाबत माहिती उपस्थित केलेली आहे. मंगल कार्यालयाबाबतची, मॉल्स संबंधीची वार्ड निहाय माहिती दोन दिवसांत दिली जाईल.

मा.सभापती :शहरात 20 वर्षापासून मंगल कार्यालय आहेत.

उपआयुक्त (प्र) :चॅरिटेबल संस्थाना सुट दिलेली आहे हा महत्वाचा मुद्दा आहे. शैक्षणिक ज्या संस्था आहे त्यातील तीन ते चार संस्थाना 100 टक्के सुट दिलेली आहे. देवगिरी महाविद्याल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठाण डॉ.हेडगेवार हॉस्पीटल,लहुजी साळवे हॉस्पीटल यांना 100 टक्के सुट दिलेली आहे. त्याअनुषंगाने इतर संस्थाना सुट दिलेली आहे त्याप्रमाणे 132 च्या अधिनियमाप्रमाणे इतरांनीही मागणी केलेली आहे. एमजीएमनेही मागणी केलेली आहे, दिनांक 28 फेब्रुवारी सभागृहामध्ये टॅक्सेशन कसे असावे या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. निवास आणि निवासेत्तर 45 टक्के ,45 टक्के आणि 37 टक्के अनिवासी असेलतर 37 टक्के द्यावे याबाबत कायदयाची बाब तपासणी करीत आहे तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट तपासावे लागेल. नफा आणि तोटाचा विचार करून निर्णय घ्यावा लागणार आहे. चॅरिटेबलच्या बाबतीत माफी देण्याची तरतुद आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :प्रशासनाला पॉलिसी मॅटर निश्चित करून सर्वांना समान कर लावण्यात यावा.

उपआयुक्त (प्र) :मा.आयुक्तां बरोबर चर्चा झाली आहे कायदयाप्रमाणे सुट देय होत नाही ते रद्द करून रेग्युलर वसुली करण्यात यावी.

श्रीमती मेहरून्निसा खान :कायदेशीर आणि बेकारदेशीर किती मंगल कार्यालय आहेत.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :जुण्या कोर्टासमोर जी जागा आहे त्याला किती कर आकारणी केली जाते. खाजगी व्यक्तिंच्या कर आकारणीकडे प्रशासनाचे लक्ष नाही.

मा.सभापती :मोतीवाला हॉल कडुन किती टॅक्स वसुल केला जातो.

श्री.सिताराम सुरे :महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अनेक मंगल कार्यालय आहेत त्यातील अनाधिकृत मंगल कार्यालयाची संख्या जास्त आहे.

श्री.रविकांत गवळी :मोअर मॉल्स शहरात सुरू झाले आहे त्यास मालमत्ता कर लावण्यात आले आहे काय? बांधकाम परवानगी दिलेली आहे काय? प्रवेश दरवाजा अतिशय

अरुंद आहे एक व्यक्तिच आत जावू शकतो, सुरक्षेच्या दृष्टीने हे घातक आहे. एनओसी दिलेली आहे काय? खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :त्यास वक्फ बोर्डाची परवानगी आहे.

श्री.भगवान घडमोडे :वक्फ बोर्डाची एनओसी असलेल्या जागेला पक्के बांधकाम करण्याची परवानगी देता येते का?

मा.सभापती :सदरील इमारतीच्या उद्‌घाटनाला मी स्वतः गेलो होतो त्यास बांधकाम परवानगी आहे तसेच कंप्लीशनही आहे.

श्री.रविकांत गवळी :बांधकाम परवानगी आहे कंप्लीशनही आहे मग मालमत्ता कर लावयला पाहिजे.

श्री.भगवान घडमोडे :वक्फ बोर्डाची एनओसी असलेल्या जागेला पक्के बांधकाम करण्याची परवानगी देता येते का?

कार्यकारी अभियंता : सर्व कागदपत्र सादर केल्यावर नियमाप्रमाणे परवानगी देता येते.

श्री.रविकांत गवळी :फायर ब्रिगेडची परवानगी दिली आहे काय? मालमत्ता कर लावलेला आहे काय? खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :फायर ब्रिगेडची एनओसी दिलेली आहे.

मुख्य अग्निशमन अधिकारी :एनओसी दिलेली आहे.

मा.सभापती :प्रशासनाकडे मंगल कार्यालयाची यादी आहे काय?

मुख्य अग्निशमन अधि. :वार्डातुन जी यादी आलेली आहे त्यात शहरामध्ये 75 मंगल कार्यालय आहेत.

मा.सभापती :दोन उधारीमध्ये बांधकाम परवानगी दिलेली आहे. अशा प्रकारे किती लोकांना उधारीमध्ये बांधकाम परवानगी दिलेली आहे. याबाबतची माहिती 3 दिवसांत स्थायी समितीस देण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे :75 मंगल कार्यालयास परवानगी दिलेली आहे आग विझविण्यासाठी फोम नावाचे रसायन असते अशा प्रकारचे तीन रसायन असतात ते कशा पध्दतीने वापरतात खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : खुलासा करण्यात यावा.

मुख्य अग्निशमन अधि.: फक्त केमिकल आगीवर फोम वापरण्यात येतो.

श्री.सिताराम सुरे :तीन प्रकार आहेत खुलासा करण्यात यावा.

मुख्य अग्निशमन अधि. : एक अल्कोहल रेसिस्टींग फोम, अल्कोहल फिल फोर्म आणि प्रोटिन फोम आहे.

श्री.सिताराम सुरे :फोर्मवर साधारणतः एका वर्षात एक कोटी ते सव्वा कोटी खर्च केलेला आहे.

मा.सभापती :फोमवर किती खर्च केलेला आहे.

मुख्य अग्निशमन अधि. :साधारणतः आठ ते दहा लाखाचा फोम दोन ते तीन वर्षापुर्वी खरेदी केलेला आहे.

श्री.सिताराम सुरे :फोम कुठे कुठे वापरण्यात आला याबाबतची माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : पुढील सभेत माहिती द्यावी.

श्री.रविकांत गवळी :संपूर्ण देश आज दहशतीखाली वावरत आहे. मुंबईवर जे अतिरेकी हल्ले झालेले आहे शहरातील ताज हॉटेल,ओबेरॉय हॉटेल आहे ज्या वेळी अशी एखादी घटना घडल्यास उपाययोजना करण्यासाठी आधुनिक यंत्रसामुग्री आहे काय? प्रशासनाने खुलासा करावा की, बांधकाम परवानगी किती मजल्यापर्यंत शहरात दिलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :मुंबई सारखी परिस्थिती उद्‌भवली तर आवश्यक त्या उपाययोजना महानगरपालिकेकडे आहे काय? महानगरपालिकेने जी वाहने खरेदी केलेली आहे चेसीस ते तीन वर्षापासून त्याच अवस्थेत उभे आहेत.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा की, चार चेसीस केव्हापासून घेतलेली आहे.

मुख्य अग्निशमन अधि. :बाराव्या वित्त आयोगाकडुन 4 चेसीस 31 मार्च 2008 ला घेण्यात आलेल्या आहेत. फेब्रीकेशनला बजेट नाही.

श्री.प्रशांत देसरडा : आपण पुर्ण प्रपोजल का पाठवल नाही. टायर खराब झाले. 2 घेवूनच पुर्ण करता आले असते.

मा.सभापती :15 महिणे झाले आहे काय कारण आहे.

मुख्य अग्निशमन अधि. :बजेट अभावी गाडया तश्याच पडुन आहेत. शासनाकडे दोन ते तीन प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहे .

श्री.रविकांत गवळी :एकुण निधी किती उपलब्ध झाला होता. आठव्या दहाव्या मजल्यावर बॉबस्फोट झाल्यास ती परिस्थिती हाताळण्यास सक्षम आहे काय?

मुख्य अग्निशमन अधि. :नाही. महानगरपालिकेकडे जास्तीत जास्त तिसऱ्या मजल्यापर्यंत काम करण्याची सामुग्री उपलब्ध आहे. 1996 पासुन मागणी करीत आहे.

श्री.रविकांत गवळी :औरंगाबाद शहर हे अतिसंवेदनशील शहर आहे त्याकरीता सर्व उपाययोजना करणे गरजेचे आहे.

मुख्य अग्निशमन अधिकारी :हायराईज बिल्डींगच्या वेगळया शिडया असतात त्या घ्याव्या लागतात. सन 1996 पासुन मागणी करत आहे आणि दरवर्षाला बजेटमध्ये मागणी करत आहे.

श्री.रविकांत गवळी :जी अत्यावश्यक यंत्रसामुग्री आहे ती तात्काळ खरेदी करण्याची सुचना करण्यात यावी नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

मा.सभापती :फायर ब्रिगेडचे प्रकरण गंभिर आहे, मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे की महानगरपालिकेकडे तीन मजल्यापर्यतची यंत्रणा उपलब्ध आहे त्यावरील मजल्यावर काम करण्यासाठी यंत्रणा उपलब्ध नाही. महानगरपालिका सध्या पाच,सात व आठ मजल्याला परवानगी देत आहे. त्यादृष्टीने आठ ते दहा मजल्यापर्यंत आग विझविण्यासाठी जी काही यंत्रणा असेल किंवा गाडी खरेदी करायची असेल त्याची बजेटमध्ये तरतुद करण्यात येईल यंत्रणा तात्काळ खरेदी करण्यात यावी. शहर अभियंता यांनी मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्याकडुन अहवाल घेण्यात यावा. चार चेसीसी मागील दिड वर्षापासुन त्याच अवस्थेत आहे त्यासाठी आणि मशीन खरेदी करण्यासाठी आठ कोटी रूपयांची स्थायी समितीमध्ये बजेटमध्ये तरतुद ठेवण्यात येईल. मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून यंत्रणा खरेदी करण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे :मागील बैठकीत पाच दोन दोन वर चर्चा केली होती त्यासंबधी चौकशी करण्यास सांगीतली होती.

मा. सभापती : कार्यकारी अभियंता श्री.पानझडे आज सभागृहात नाहीत.

श्री.सतिष कटकटे :श्रावण महिणा सुरू झालेला आहे सिल्लेखाना परिसरात उघडयावरती मांस विक्री सुरू आहे. मा.आयुक्तांना विनंती आहे की तात्काळ मांस विक्री थांबविण्यात यावी.

मा.सभापती :मा.आयुक्तांनी साफसफाईवर विशेष लक्ष दिलेले आहे त्याबाबत त्यांचे अभिनंदन करण्यात येते. तसेच मा.आयुक्त 16 ते 17 तास काम करीत आहेत त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.विनायक पांडे :सुरक्षा व्यवस्था काढण्यात आली आहे,उघडयावर सिल्लेखाना येथे मांस विक्री सुरू आहे.

पशुसंवर्धन अधिकारी :18 तारखेला दोन वाजता मा.पदाधिकारी श्री.कटकटे, श्री.बारवाल, श्री.खुडे त्या ठिकाणी आले होते. त्या ठिकाणी अवैध कत्तल झालेले काही अवशेष रोडच्या कडेला पडलेले होते त्या ठिकाणी सेक्युरिटी लावण्यात आलेली होती परंतु सेक्युरिटीचे कर्मचारी काम करीत नसल्यामुळे हत्यारी सेक्युरिटी लावलेले होते परंतु त्यांचेकडे हत्यारे नव्हते.

श्री.सतिष कटकटे :प्रशासनाच्या म्हणण्यानुसार त्यांच्याकडे शस्त्र नाही. 20 कर्मचारी शस्त्रधारक घेतलेले आहे.

मा.सभापती :20 कर्मचारी घेतलेले आहे काय? खुलासा करण्यात यावा.

पशुसंवर्धन अधिकारी :ज्यांच्याकडे शस्त्र नव्हते त्यांना काढुन टाकण्यात आलेले आहे. फक्त 06 कर्मचारी कार्यरत आहे. महाराणा सेक्युरिटी यांना 03 नोटीसा देण्यात आलेली आहे. पडेगांव कत्तलखान्यावर सुविधा नाही अशा नागरीकांच्या तक्रारी होत्या.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :सिल्लेखाना रोडवरून जातांना नेहमी मांसची दुर्गंधी असते.

श्री.प्रशांत देसरडा :स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुतळयाजवळ हे प्रकार घडत असतात त्या कारणाने कायदा सुवस्थाचा प्रश्न उद्‌भवू शकतो.

मा. सभापती : आपण पुर्ण कंट्रोल केले होते. आता पुन्हः का प्रश्न निर्माण होतो.

श्री.सतिष कटकटे :मा.आयुक्तांनी प्रत्यक्ष स्थळावर जावून पहाणी करावी.

मा.सभापती :प्रशासनाकडे कुठल्या उपाययोजना आहेत. कंट्रोलींगसाठी किती शस्त्रधारी सुरक्षारक्षक लागणार आहे.

पशुसंवर्धन अधिकारी :चार ते पाच ठिकाणी अवैध कत्तलखाण्यासाठी 23 शस्त्रधारी सुरक्षारक्षकांची मागणी केली होती. पोलीस संरक्षण मिळायला पाहिजे.

श्री.रविकांत गवळी :जे शस्त्रधारी माजी सैनिक आहे त्यांच्या महामंडळाकडुन नियम आलेले आहेत नउ हजार मासिक वेतन असेलतर ते सेवा उपलब्ध करून देतात. महानगरपालिका एजन्सीकडुन पाच हजार रूपयांमध्ये सेवा उपलब्ध करून घेते. त्यात एकुण सहा शस्त्रधारी बोलविण्यात आलेले आहे आणि बाकी लाठीधारी आहेत.

श्री.भगवान घडमोडे :कत्तल रोखण्यासाठी शस्त्रधारी कर्मचारी असणे हेच चुकीचे आहे. जी अवैध कत्तल होते त्यावर नियंत्रणासाठी कडक कारवाई झालेली आहे का?गुन्हे

नोंदविलले आहेत काय हा विषय आहे. रॉक्सी सिनेमा टॉकीज ते सिल्लेखाना या ठिकाणापर्यंत महानगरपालिकेची दुकाने आहेत. त्या ठिकाणी जनावरे बांधले जातात.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

पशुसंवर्धन अधिकारी :अवैध कत्तलीच्या दृष्टीने आणलेली जनावरे पकडण्यासाठी वाहने उपलब्ध नाहीत. वाहने घेण्याची कारवाई चालू आहे लवकरच वाहने उपलब्ध होतील.

मा.सभापती :मालमत्ता अधिकारी यांनी मदत करून पशुसंवर्धन अधिकारी यांनी तातडीने कारवाई करण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी :चेतना नगर येथील शाळेची वेळ संपल्यानंतर अवैध धंदे चालत असतात ते थांबणे गरजेचे आहे. अशा प्रकारचे प्रकार इतर ठिकाणीही मॉल,शॉपिंग सेंटर, शाळा व महापालिकेच्या इतर इमारतीत चालत आहे त्याकरीता सुरक्षा रक्षक नेमणे गरजेचे आहे.

मा.सभापती :प्रशासनाकडुन तात्काळ सुरक्षा रक्षकांची मंजूरी घेण्यात यावी व असे प्रकार पुन्हा घडू नये याकडे लक्ष देण्यात यावे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :पोल वरील लाईट चोरीला जात आहे. याची देखभाल दुरूस्ती कोण करीत आहे.

कार्यकारी अभियंता :देखभाल दुरूस्ती महानगरपालिकेनेच करायची आहे. जे चोरीला गेलेले लाईट आहे त्याबाबतीत तपासणी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल व लाईट बसविण्यात येईल.

श्री.रविकांत गवळी : पैठणगेट येथील सादिया मार्केट मधील तळमजला पर्ल एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीस भाडेतत्वावर देण्यास मंजुरी दिल्यानुसार करारनामा करावयाचा आहे. परंतु अनेक वर्षापासून ही जागा बंद असल्याने पावसाच्या पाण्यामुळे मानवीय वापरायोग्य करण्यासाठी ३-४ लाख खर्च अपेक्षीत आहे. संबंधीत संस्थेने सदरचे हॉलची दुरूस्ती स्वखर्चाने करण्यास तयार आहे. अनामत घेण्याऐवजी हॉलची दुरूस्ती करून घ्यावी व त्यांचेकडून तीन महिन्याचे भाडे भरणा करून घेऊन करारनामा करून घ्यावा.

मा. सभापती : स.सदस्यांनी निवेदीत केल्यानुसार सादिया मार्केट मधील पर्ल एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीस भाडेतत्वावर दिलेली जागा अनेक वर्षापासून बंद असल्याने वापरायोग्य करण्यासाठी लागणारा खर्च संबंधीत संस्था स्वतः करण्यास तयार आहे. करीता त्यांचेकडून अनामत रकमे ऐवजी हॉलची दुरूस्ती करून घ्यावी तीन महिन्याचे भाडे भरणा करून घेऊन करारनामा करून घ्यावा.

**ठराव :**

दिनांक १५/६/२००९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ३५ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ई व फ), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.९२ मिलींदनगर येथे खुल्या जागेत उद्यान विकसित करणे या कामाकरीता रक्कम रू.११९७५५७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च नविन उद्यान विकास या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येईल. सन २००९-१० च्या स्पील ओव्हर कामामध्ये सदर

कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. तरी सदर कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रू.११९७५५७/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९२ मिलींदनगर येथे खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.११,९७,५५७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ऐतिहासिक खिजरी (हत्ती) गेटची जतन व दुरूस्ती करण्यासाठी इंडियन नॅशनल ट्रस्ट ऑफ आर्टस् अँड कल्चरल हेरिटेज (इनटॅक) या संस्थेचे मार्गदर्शन घेण्यात येणार असुन त्यांचे निगराणीखाली दरवाज्याचे काम करण्यात येणार आहे. सदर काम नेहमीच्या बांधकामापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे असुन संपुर्ण कामासाठी ट्रॅडीशनल प्रकारची वीट, चुना, दगड हे साहित्य उपयोगात आणण्यात येणार असल्याने सदर कामाचे अंदाजपत्रक इनटॅक संस्थेच्या वास्तुशास्त्र तज्ञांकडून तपासुन घेण्यात आलेले आहे व सदर कामासाठी यापुढेही त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

सदरील कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००७-२००८ च्या दरसूची नुसार रक्कम रूपये १८,७४,०४८/- चे अंदाजपत्रक असुन सदरील कामाचा खर्च ऐतिहासिक दरवाजे शिर्षामधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | गायत्री आर्कीटेक्ट | १०.५% जास्त दराने. |
| २. | श्री.मुबारक महेबुब पठाण | १२.००% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५% जास्त दराची गायत्री आर्कीटेक्ट यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी गायत्री आर्कीटेक्ट यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५% जास्त दराचा निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ऐतिहासिक खिजरी (हत्ती) गेटची जतन व दुरूस्ती करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक गायत्री आर्कीटेक्ट यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.५% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ई व फ), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.८९ शंभु महादेव नगर येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१७,६७,७००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.३८० दिनांक २८/२/२००९ अन्वये मंजुरी प्राप्त झाली असुन सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील सहा निविदा दर भरून प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.आर.के. कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा २०.९८% कमी दराने |

२. श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश अं.प.दरापेक्षा १८.००% कमी दराने
३. मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा १४.९०% कमी दराने
४. मे.राणा कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा १३.८६% कमी दराने
५. मे.हायवे कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा ८.९९९% कमी दराने
६. मे. तुषार कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा ७.१०% कमी दराने

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९८% कमी असे आहेत.

तरी मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९८% कमी दराची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८९ शंभु महादेव नगर येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.आर.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९८% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ई व फ), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.८८ अंतर्गत विविध ठिकाणी खुली जागा विकसीत करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९०,१४०/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.३९९ दिनांक २८/२/२००९ अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असुन सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. मे. तुषार कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा ४.९६% कमी दराने
२. काझी मो.फारूकी मो.ईसमाईल अं.प.दरापेक्षा ३.९९% कमी दराने

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.तुषार कन्स्ट्रक्शन यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९६% कमी असे आहेत.

तरी मे.तुषार कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९६% कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८८ अंतर्गत विविध ठिकाणी खुली जागा विकसीत करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.तुषार कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९६% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२१ मिसारवाडी नारेगांव वसाहतीत नवीन जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी शासनाचे दलित वस्ती सुधार योजनेतुन प्रस्तावित अंदाजपत्रक रक्कम रूपये २७,६०,०००/- च्या कामासाठी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र क्र.२००८/नपाप्र/मनपाऔ/दवसुयो/कावि/१६६, दिनांक ७.१०.२००८/१७.२.२००९ अन्वये मंजुरी मिळाली आहे. त्या अन्वये

सदर कामासाठी निविदा मागविली असता, एकूण ०८ निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकूण ०८ निविदा पत्रके भरून प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तपशिल खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.अरबाज कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा २१.८६% कमी दराने |
| २. | श्री. एम. ए. सईद | अं.प.दरापेक्षा २०.६% कमी दराने |
| ३. | मे. अमन असोसिएटस् | अं.प.दरापेक्षा १७.७७% कमी दराने |
| ४. | श्री.फारूकी जफीरूद्यीन सैफुद्यीन | अं.प.दरापेक्षा १६.९९% कमी दराने |
| ५. | मे.इराम कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा ११.२३% कमी दराने |
| ६. | मे.हायवे कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ८.९९९% कमी दराने |
| ७. | श्री.शेख सलीम मोहिउद्यीन | अं.प.दरापेक्षा ५.११% कमी दराने |
| ८. | मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स | अं.प.दरापेक्षा १७.९१% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८६% कमी दराचे मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रक आहे. तरी मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८६% कमी दराचे निविदा पत्रक मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२१ मिसारवाडी नारेगांव वसाहतीत नवीन जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८६% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४० :**

कार्यकारी अभियंता, वॉर्ड ब व क प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.२४, एन-१, सिडको या ठिकाणी १०० मी.मी. ए.सी. ऐवजी २०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहिनी टाकणे या कामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.९,१९,३९६/- चे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा.शहर अभियंता यांची मंजुरी झालेली आहे.

ई-निविदा विभागातर्फे निविदा कार्यवाही केली असता दर भरलेली एक निविदा प्राप्त झाली असून श्री.सुरेश बी. साधवानी यंची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त दराची निविदा आहे. उपरोक्त नुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% जास्त दराची निविदा श्री.सुरेश बी.साधवानी यांची असून संबंधीत गुत्तेदार यांना दर कमी करण्यासाठी वाटाघाटीस बोलावून त्यांना दर कमी करण्यास सांगितले असता त्यांनी अं.प.दरापेक्षा १७% जास्त दराने निविदा मान्य करण्यास विनंती केली आहे. त्यास मा.शहर अभियंता यांनी मान्यता दिली आहे.

करीता श्री.सुरेश बी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची निविदा स्विकृती बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा :ऐनवेळेचे जे विषय आहेत त्या बाबतीत काही धोरण ठरवून जे सभागृहापुढे वाचुन दाखविण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे : प्रस्ताव घ्या पण सभागृहात वाचुन दाखवावे. मागच्या वेळी ऐनवेळेचे विषय सदस्यांना वाचून दाखविण्यात आलेले नाही.

मा.सभापती :आचारसंहिता लागू होणार आहे. त्यामुळे प्रशासनाचे ऐनवेळेचे विषय येतात ते मंजूर करण्याचे आपल्याला अधिकार आहेत.

श्री.भगवान घडमोडे :प्रशासनाचे असतील किंवा स.सदस्यांचे वार्डातील असतील ऐनवेळचे विषय सभागृहात वाचून दाखविले पाहिजे. सभागृहाला माहिती झाली पाहिजे. मागिल बैठकीत ऐनवेळचे विषय वाचून दाखविलेले नव्हते.

मा.सभापती :यानंतर ऐनवेळी आलेले विषय सभागृहात वाचून दाखविण्यात येतील. हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२४, एन-१, सिडको या ठिकाणी १०० मी.मी. ए.सी. ऐवजी २०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहिनी टाकणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्कदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम श्री.सुरेश बी.साधवानी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ऐतिहासिक छोटा भडकलगेट दरवाज्याची दुरूस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००७/०८ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.९,५८,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाच्या फेर निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत १ निविदा विक्री झाली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत १ निविदा दर भरून प्राप्त झाली असल्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. मे.गायत्री आर्कीटेक्ट अं.प.दरापेक्षा ७.५०% जास्त दराने.

सदर प्रस्तावित कामाची एकमेव निविदा मे.गायत्री आर्कीटेक्ट यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दराने असुन ज्यामुळे सदरील कामावर एकुण रक्कम रू.१०,२९,६०८/- एवढा खर्च होणार असून मा.आयुक्त महोदय यांनी उक्त मे.गायत्री आर्कीटेक्ट यांच्या अं.प.दरापेक्षा ७.५०% जास्त दराच्या निविदेस शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेस्तव आदेशीत केले आहे.

तरी मे.गायत्री आर्कीटेक्ट यांच्या अं.प.दरापेक्षा ७.५०% जास्त दराच्या निविदेचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ऐतिहासिक छोटा भडकलगेट दरवाज्याची दुरूस्ती करणे या कामासाठी प्राप्त झालेली मे. गायत्री आर्कीटेक्ट यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२ :**

कार्यकारी अभियंता वॉर्ड ब व क हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगबाद टाईम्स कॉलनी त्रिवेणीनगर येथे आरसीसी पुल बांधणेच्या कामासाठी सा.बां.विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१७,०२,२००/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती बैठक दि.६/११/२००७ ठराव क्र.२०३ अन्वये मंजुर झालेले होते. या कामासाठी रितसर निविदा मागविण्यात आली असता कामासाठी

मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.९२% कमी दराची निविदा दाखल केली होती व त्यास मा.स्थायी समिति बैठक दि.३०/४/२००८ ठराव क्र.१४ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. परंतु कामाचा कार्यादेश गुत्तेदारास अद्याप पर्यंत देण्यात आलेला नसल्याने व गुततेदाराने कामासाठी सुधारीत दराची मागणी करत, काम करण्यास तयार नसल्याचे कळविले आहे.

या कामा संबंधाने दि.१५/६/२००९ च्या मा.स्थायी समितीच्या सभेमध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी मा.सभापती, स्थायी समिती यांनी आदेशीत केल्याप्रमाणे गुत्तेदारावर कार्यवाही करून कामाची सुधारीत दराने फेर निविदा मागविण्यासाठी संचिका सादर केली असता, त्यावर तांत्रिक विभागाने दिलेल्या टिप्पणी मध्ये नमुद केलेल्या 'अ' ते 'फ' या मुद्यांना मा.आयुक्त यांनी दि.१७/७/२००९ रोजी मान्यता दिली आहे. या मान्यतेनुसार निविदा उघडल्या पासून तात्काळ कार्यवाही न केल्यामुळे व कामास सुधारीत अंदाजपत्रक/फेर निविदा करावी लागत असल्यामुळे प्रकरणी झालेला विलंब व विलंबामुळे होत असलेली महानगरपालिकेचे आर्थिक नुकसानीसाठी संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावयाची आहे. तसेच गुत्तेदाराची १% अनामत व २% सुरक्षा ठेव रक्कम जप्त करावयाची आहे.

प्रस्तावित कामासाठी सा.बां. विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसुची नुसार तयार केलेले सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१९,९०,७७७/- चे मंजुरीस्तव व फेर निविदा मागविण्याच्या आदेशास्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगबाद टाईम्स कॉलनी त्रिवेणीनगर येथे आरसीसी पुल बांधणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९०,७७७/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सदर कामासाठी फेर निविदा मागविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३५, गरमपानी ते छावणी भागास जोडणाऱ्या अस्तित्वातील कल्व्हर्टची रूंदी व उंची अत्यंत कमी असल्यामुळे नवीन आर.सी.सी. पुल बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. विभागची सन २००७-०८ चे दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अं.प.रक्कम रू.४२,४०,१००/- आहे. सदर अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.२९८, दिनांक २०/०९/२००८ अन्वये प्रस्तुत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाच्या निविदा जा.क्र.मनपा/अशअ/५३/२००८, दिनांक ०३/०२/२००९ द्वारे ई-टेंडरींग विभागामार्फत मागविण्यात आल्या असता मे. एल.के. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकापेक्षा ७२.७२% जास्त दराची निविदा प्राप्त झाली होती. प्राप्त निविदेतील दर खुप जास्त असल्यामुळे पुनःर्निविदा काढण्यात आली. दिनांक २४/२/२००९ द्वारे ई-टेंडरींग विभागामार्फत फेरनिविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या. दिनांक १/४/२००९ रोजी दर भरून एक निविदा प्राप्त झाली असून मे. अमन असोसिएटस् यांची २४.५६% जास्त दराची आहे. २४.५६% जास्त दराच्या प्राप्त निविदेनुसार रक्कम रू.५२,८१,४६९/- खर्च अपेक्षित आहे. अं.प. पेक्षा २४.५६% जास्त दराच्या निविदेस मा.आयुक्त महोदय यांची मंजुरी प्राप्त झाली आहे. तरी मे.अमन असोसिएट्स यांची २४.५६% जास्त दराची निविदा व जास्त दरामुळे होणाऱ्या उपरोक्त नमुद अपेक्षीत खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्रीमती मेहरून्निसा खान :सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा विकास कामासाठी निधी उपलब्ध नाही.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

अति.शहर अभियंता :सदरील प्रशासकीय स्थायी समोर ठेवण्याचे कारण म्हणजे सर्वसाधारण सभेने या कामाकरीता निधी उपलब्ध करून दिला होता त्यानुषंगाने प्रस्ताव तयार होउन मंजूर होउन स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला.

श्री.सतिष कटकटे :सदरील जागा छावणीची आहे महानगरपालिका काम करू शकते काय?

अति.शहर अभियंता :छावणीत काम नाही खामनदीवर काम आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रकर :त्या ठिकाणी असलेला डिपी रोड वाढविता येईल काय?

अति.शहर अभियंता :डिपी रोड आहे दरवाजाच्या दोन्ही साईडनी रोड करता येईल सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्रीमती मेहरून्निसा खान :निधी उपलब्ध कोणी करून दिलेला आहे.

अति.शहर अभियंता :सर्वसाधारण सभेने निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

मा.सभापती :विषय मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३५, गरमपानी ते छावणी भागास जोडणाऱ्या अस्तित्वातील कल्व्हर्टची रूंदी व उंची अत्यंत कमी असल्यामुळे नवीन आर.सी.सी. पुल बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेली मे.अमन असोसिएटस् यांची २४.५६% जास्त दराची निविदा स्विकारणेस व त्यानुसार येणाऱ्या रक्कम रू.५२,८१,४६९/- च्या अपेक्षित खर्चासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२ मयुरपार्क-जाधववाडी या वॉर्डामध्ये अद्यापपर्यंत नागरीकांना पुर्ण नागरी सुविधा उपलब्ध नाहीत. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने नागरीकांना रस्त्यावरून चालण्यासाठी खुप कसरत करावी लागत आहे. कारण की, या वार्डात काळ्या मातीची जमीन असल्यामुळे पावसाळ्यात चिखल होत असतो. नागरीकांनी अनेक वेळेस महानगरपालिकेला कळविले आहे की, आमच्या कॉलनीमध्ये रस्ता तयार करून द्यावा. परंतु अद्याप मनपाकडून नागरीकांच्या रस्त्याची समस्या सुटलेली नाही. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे. म्हणुन माझ्याकडे नागरीकांनी कॉंक्रीट रस्त्याची मागणी केलेली आहे. सदरचे काम तात्काळ करणे अत्यंत गरजेचे आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अंदाजे रू.२०.०० लाखा पर्यंतचे अंदाजपत्रक तयार करून मयुरपार्क-जाधववाडी मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्त्याचे काम तातडीने करून घेण्यात यावे. जेणे करून नागरीकांची रस्त्याची समस्या सुटेल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सिताराम सुरे        अनुमोदक : रविकांत गवळी, सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. २ मयुरपार्क-जाधववाडी या वॉर्डामध्ये अद्यापपर्यंत नागरीकांना पुर्ण नागरी सुविधा उपलब्ध नाहीत. तसेच या वार्डात काळ्या मातीची जमीन असल्यामुळे पावसाळ्यात चिखल होतो. म्हणुन या भागात कॉंक्रीट रस्त्याचे काम तात्काळ करणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये अंदाजे रू.२०.०० लाखा पर्यंतचे अंदाजपत्रक तयार करून मयुरपार्क-जाधववाडी मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्त्याचे काम तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९६ मधील मो. सिल्कमील कामगार हौ.सोसा. सफा मस्जीदच्या परिसरात, सिल्कमील कॉलनी या भागातील वतन टेक्स्टाईल ते मजिदिया हॉल पर्यत, अबरार

कॉलनी येथीज जावेदभाई यांच्या घरापासुन ते नाल्यापर्यंतची, हमीद कॉलनी ते बीड बायपास रोड पर्यंतची ड्रेनेज लाईन सुमारे २० वर्षापुर्वीची जुनी लहान व्यासाची लाईन असुन वारंवार चोकअप होऊन रहिवासीयांना फार त्रास सहन करावे लागत आहे. रहिवासियांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. वारंवार सुचना करूनही सदरील काम होत नाही. सदरील ड्रेनेज लाईन बदलण्याचे काम तातडीने करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफिया फिरदौस अयुब खान अनुमोदक : रविकांत गवळी, सिताराम सुरे

**संवाद :**

श्री.भगवान घडमोडे :माझ्या वार्डातील तातडीचे कामे 5-2-2 नुसार झाले पाहिजे. आचारसंहिता लागणार असल्यामुळे सर्व कामे 5-2-2 नुसार करण्यात यावे.

मा.सभापती :सदरील प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. परंतु सदरील प्रस्ताव प्रशासनामार्फत येईल आणि मंजूर करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९६ मधील मो. सिल्कमील कामगार हौ.सोसा. सफा मस्जीदच्या परिसरात, सिल्कमील कॉलनी या भागातील वतन टेक्स्टाईल ते मजिदिया हॉल पर्यत, अबरार कॉलनी येथीज जावेदभाई यांच्या घरापासुन ते नाल्यापर्यंतची, हमीद कॉलनी ते बीड बायपास रोड पर्यंतची ड्रेनेज लाईन सुमारे २० वर्षापुर्वीची जुनी लहान व्यासाची लाईन बदलण्याचे काम तातडीने करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६ :**

उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीचे भाग्यनगर येथील सभागृहाचे क्षेत्रफळ १५६.७५ चौ.मी. हे श्री. बालाजी सुर्यवंशी, अध्यक्ष, मराठी पत्रकार संघ, औरंगाबाद यांनी भाडेतत्वावर देणे बाबत विनंती अर्ज केला आहे.

त्यानुसार सदरील जागेसाठी रू.११,५६०/- प्रती चौ.मी. प्रती माह, अनामत रक्कम मासिक भाड्याच्या बारा पट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती वर्ष प्रमाणे आकारून व महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार भाडेपट्टयाने देणे योग्य. करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

संवाद :

श्री. प्रशांत देसरडा : सदर सभागृह मराठी पत्रकार संघाने भाडेतत्वावर मागणी केलली आहे. या सभागृहाचा व्यावसायिक दृष्टीने वापर होणार नाही. त्यामुळे आकारण्यात येणारे भाडे नाममात्र असावे किंवा भाडे १०००/- रूपये प्रती माह आकारण्यात यावे.

मा. सभापती : स.सदस्य श्री.प्रशांत देसरडा यांच्या सुचनेप्रमाणे प्रतिमाह रू.१०००/- भाडे आकारणी करून मराठी पत्रकार संघास सदरचे सभागृह भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. दुरूस्तीसह प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेअंती ठरल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे भाग्यनगर येथील सभागृहाचे क्षेत्रफळ १५६.७५ चौ.मी. हे श्री.बालाजी सुर्यवंशी, अध्यक्ष, मराठी पत्रकार संघ, औरंगाबाद यांना रू.१०००/- प्रती प्रती माह, अनामत रक्कम मासिक भाड्याच्या

बारा पट, सेवा शुल्क रू.५/- प्रती चौ.मी. प्रती माह व अकृषी कर रू.७.६८/- प्रती वर्ष प्रमाणे आकारून व महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार भाडेपट्टयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९६ मधील मोहल्ला अब्दुल हमीद कॉलनी, अबरार कॉलनी मधील बिस्मील्ला मस्जीद ते बिड बायपास येथील डॉ.हिना यांच्या घरापर्यंत रोड रस्ते नसल्याने सध्या पावसाळा सुरू असल्याने सर्वत्र चिखल होत असुन रहिवासीयांना रहदारी तथा वाहतुकीस फार त्रास होत आहे. सध्या अनेक वाहने घसरून पडल्याने किरकोळ अनेक अपघात होत आहे. करिता मोहल्ला अब्दुल हमीद कॉलनी, अबरार कॉलनी मधील बिस्मील्ला मस्जीद ते बिड बायपास येथील डॉ.हिना यांच्या घरापर्यंत त्वरीत कॉंक्रेटींग रस्ता तयार करण्यात यावा. सदरील काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफिया फिरदौस अयुब खान　　अनुमोदक : जावेद हसन खान, खान मेहरून्नीसा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९६ मधील मोहल्ला अब्दुल हमीद कॉलनी, अबरार कॉलनी मधील बिस्मील्ला मस्जीद ते बिड बायपास येथील डॉ.हिना यांच्या घरापर्यंत त्वरीत कॉंक्रेटींग रस्ता तयार करण्याचे सदरील काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड इ व फ) यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.८० अंबिकानगर, मुकुंदवाडी अंतर्गत राजीवगांधी नगर भागात विविध व्यासाच्या जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभगाची दरसूची सन २००५-०६ नुसार रक्कम रूपये ९४,६३,९९२/- एवढ्याचे तयार करण्यात आलेले असून, त्यात सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.६१६ दि.१५.१२.२००६ अन्वये मान्यता झालेली आहे.

सदर कामास मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्यातर्फे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत अनुदान प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यांनी सदर कामासाठी फक्त रूपये २०,००,०००/- एवढ्या रक्कमेची तरतूद उपलब्ध करून दिली आहे. सदर कामाचा खर्च नागरी दलित वस्ती सुधार योजना या लेखाशिर्षातून करण्यात येईल.

मा.जिल्हाधिकारी यांच्यातर्फे प्राप्त झालेल्या अनुदानातून सदरचे काम करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभगाची दरसूची सन २००८-०९ नुसार रू.१९,९९,२९१/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन निविदा कार्यवाही करण्यात आली. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या, त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.व्ही.एस.देशमुख | १५.९९% जास्त |
| २. | मे. नुर कन्स्ट्रक्शन | १६.७८% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मक दृष्ट्या पाहता कमी दराची निविदा ही श्री.व्ही.एस.देशमुख यांची असून, त्यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.९९% जास्त असा दर दिलेला असून, त्यास प्रशासकीय मान्यता झाली आहे.

करीता श्री.व्ही.एस.देशमुख यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.९९% जास्त दराची निविदा स्विकृतीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.८० अंबिकानगर, मुकुंदवाडी अंतर्गत राजीवगांधी नगर भागात विविध व्यासाच्या जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १५.९९% जास्त दराची श्री.व्ही.एस.देशमुख यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चाणक्यपुरी ते शंभु महादेव नगर ५० मीटर विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,९९,७००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती विषय क्र.१७९ दि.४.२.२००९ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता एकुण पाच निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पाचही निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.ए. एस. कन्स्ट्रक्शन | ७.००% जास्त |
| २. | मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ८.००% जास्त |
| ३. | श्री. एम.ए. सिद्यीकी | १०.८६% जास्त |
| ४. | मे. अरोरा कन्स्ट्रक्शन | १३.६०% जास्त |
| ५. | श्री. चंद्रम्मा आशन्ना | १५.००% जास्त |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मे.ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराने आहेत. सदरील प्राप्त दर जास्त वाटत असल्याने मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांना दराचे वाटाघाटीस्तव बोलावले असता त्यांनी सदरील काम ७% जास्त दराऐवजी ५% जास्त दराने करण्याची संमती दर्शविली आहे व त्यास मा.आयुक्त यांची मान्यताही प्राप्त झाली आहे.

तरी सदरील काम मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून वाटाघाटी अंती ठरलेल्या दराप्रमाणे म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने करून घेण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चाणक्यपुरी ते शंभु महादेव नगर ५० मीटर विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामा करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद